RNI. MAHMUL02937/2010/35848 SOCIAL GROWTH IMPACT FACTOR - 4.35 ISSN 2229-6190
Issue : XIV, Vol. I, May 2017 To Oct. 2017 

5

# महाराष्ट्राच्या महसूलातील प्रवृतीचा अभ्यास

**डॉ. दयानंद विश्वंभर शिंदे**
अर्थशास्त्र विभाग,
शंकरराव पाटील महाविद्यालय,
भूम, जि. उस्मानाबाद

*Research Paper - Economics*

भारतीय राज्य घटनेतील कलम ११२ च्या तरतुदीनुसार केंद्र सरकारच्या अर्थमंत्र्यास दरवर्षी संसदेमध्ये अंदाजपत्रक सादर करणे बंधनकारक आहे. त्याच प्रमाणे राज्य घटनेतील कलम २०२ च्या तरतुदीनुसार राज्य सरकारच्य अर्थमंत्र्याला राज्य विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहात अंदाजपत्रक सादर करावे लागते. सर्वसाधारणपणे अंदाजपत्रक फेब्रुवारी महिन्याअखेच्या दिवशी सादर करण्याची प्रथा प्रचलीत होती. परंतु केंद्रातील सत्तेची समिकरणे बदलल्यामुळे अंदाजपत्रक अशा प्रकारचे वर्गीकरण करता येते. महसूली अंदाजपत्रकात महसूली जमा आणि महसूली खर्च अशा दोन बाजू असतात. महसूली अंदाजपत्रकात कर आणि करेतर बाबीपासून मिळणाऱ्या महसूली प्राप्तीचा समावेश होतो. महसूली अंदाजपत्रकातील खर्च हा प्रामुख्याने प्रशासन, पोलीस, न्यायालयीन यंत्रणा, संरक्षण, करवसुली इत्यादी बाबीवर करण्यात येतो.

भांडवली अंदाजपत्रकात सरकारच्या भांडवली प्राप्ती आणि भांडवली खर्चाचा समावेश होतो. भांडवली प्राप्तीमध्ये प्रामुख्याने राज्य सरकारकडून वसुल होणारी कर्जे आणि सार्वजनिक उद्योगांच्या नफ्याची प्राप्ती, अल्पबचत प्राप्ती इत्यादींचा समावेश होतो. भांडवली खर्चात प्रामुख्याने केंद्र सरकारने राज्य सरकारांना दिलेली कर्जे, आर्थिक विकासावर होणारा भांडवली खर्च इत्यादीचा समावेश होतो.

कोणत्याही देशात आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्ट्ये गाठण्याचे एक साधन म्हणून अंदाजपत्रकीय धोरणास अत्यंत महत्व असते. भारतासारख्या विकसनशील देशात अंदाजपत्रकाची काही महत्वाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे असतात.

१. पूर्ण रोजगार प्रस्थापीत करणे.

२. देशातील मागासलेल्या प्रदेशांचा विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणे.

३. आर्थिक विषमता कमी करणे.

४. आर्थिक विकासास गती देणे.

**राज्य सरकारच्या महसूली जमेच्या (प्राप्तीचे) मार्ग :**

राज्य सरकारच्या महसूली अंदाजपत्रकात महसूली प्राप्ती (महसूली जमा) आणि महसूली खर्च अशा दोन महत्वाच्य बाजू असतात. राज्य सरकारच्या महसूली प्राप्ती वा महसूली जमेचे अनेक मार्ग असतात. याचे ठळकपणे दोन प्रकार असतात. एक म्हणजे कर महसूल आणि दुसरा करेतल महसूल होय. कर महसूल म्हणजे राज्य सरकारला वेगवेगळ्या कराच्या माध्यमातून प्राप्ती (उत्पन्न) होते. त्यास राज्य सरकारचा स्वतःचा कर महसूल असे म्हटले जाते. राज्य सरकारला ज्या विविध करापासून प्राप्ती होते त्यात प्रामुख्याने मुल्यवर्धीत कर, राज्य उत्पादन शुल्क, जमीन महसूल, मुद्रांक व नोंदणी शुल्क, वाहनावरील कर, उत्पन्न व खर्चावरील इतर कर, विजेवरील कर व शुल्क, माल व उतारु वरील कर, वस्तू आणि सेवा यावरील कर व शुल्क यांचा समावेश होतो. राज्य सरकारला महसूली प्राप्तीचा दुसरा मार्ग म्हणजे करेतर महसूल होय. राज्य सरकारला कराव्यतिरिक्त दुसऱ्या मार्गाने देखील प्राप्ती होते. यामध्ये प्रामुख्याने केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या सहायक अनुदानाचा समावेश होतो. त्याचप्रमाणे वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार आणि योजना आयोग (निती आयोग) च्या सुचनेनुसार देखील सहायक अनुदाने देखील घटक राज्यांना दिली जातात. त्या व्यतिरिक्त व्याज विषयक जमा रकमा व इतर करा व्यतिरिक्त प्राप्तीचा (उत्पन्नाचा) यामध्ये समोवश होतो.

**महाराष्ट्र सरकारची महसूली जमा :**

महाराष्ट्र राज्य सरकारच्या मागील पाच वर्षातील महसूली जमा पुढील तक्यात दर्शविली आहे.

**तक्ता क्र. १ - एकूण महसुली प्राप्ती**

**(रुपय कोटी)**

| वर्ष | कर महसूल | करेतर महसूल | एकूण महसूली जमा |
|---|---|---|---|
| २०१०-११ | ८६४४७ | १९४२१ | १०५८६८ |
| २०११-१२ | १००९५२ | २०३३४ | १२१२८६ |
| २०१२-१३ | ११८६४० | २४३०७ | १४२९४७ |
| २०१३-१४ | १२६९६१ | ३१४४९ | १५८४१० |
| २०१४-१५ | १३८८५३ | ४१४६७ | १८०३२० |

आधार : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१४-१५, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35 ISSN 2229-6190
SOCIAL GROWTH
Issue : XIV, Vol. I, May 2017 To Oct. 2017 

वरील व्रत्तावरुन असे लक्षात येते की, मागील पाच वर्षाच्या कालावधीत कर महसूल आणि करेतर महसूल या दोन्ही मध्ये वाढ होत आहे. त्याचा परिणाम एकूण महसूली प्राप्तीमध्ये देखील वाढ होतांना दिसून येते. २०१०-११ या वर्षी कर महसूल एकूण ८६,४४७ कोटी रुपये होता. २०१४-१५ मध्ये तो १,३८,८५३ कोटी रुपये पर्यंत वाढला. याचा अर्थ गेल्या पाच वर्षात कर महसूलीमध्ये १.६ पट वाढ झाली असे म्हणता येते. त्याचप्रमाणे २०१०-११ मध्ये करेतर महसूल १९,४२१ कोटी रुपये होता. सन २०१४-१५ मध्ये करेतर महसूलात एकूण ४१,४६७ कोटी रुपये इतकी वाढ झाली. मागील पाच वर्षात ही वाढ जवळपास दोन पटीपेक्षा जास्त आहे. २०१०-११ मध्ये एकूण महसूली जमा १,०५,८६८ कोटी रुपये होती. २०१४-१५ मध्ये एकूण महसूली जमा रुपये १,८०,३२० कोटी रुपये इतकी होती. याचा अर्थ मागील पाच वर्षात एकूण महसूली प्राप्ती मध्ये एकूण १.७ पट वाढ झाली.

**महाराष्ट्राचा कर महसूल :**

महाराष्ट्र सरकारला वेगवेगळ्या करांच्या माध्यमातून प्राप्ती (उत्पन्न) होत असते. त्याचप्रमाणे केंद्रीय करातील ठरावीक हिस्सा देखील राज्य सरकारला मिळतो. अशा रितीने महाराष्ट्र सरकारच्या कर महसूल म्हणजे राज्याचा स्वत:चा कर महसूल आणि केंद्रीय करातील हिस्सा यांची बेरीज असते.

**तक्ता क्रं. महाराष्ट्राचा कर महसूल**

**(कोटी रुपये )**

| वर्ष | राज्याचा स्वत:चा कर महसूल | केंद्रीय करातीत हिस्सा | एकूण कर महसूल |
|---|---|---|---|
| २०१०-११ | ७५०२८ | ११४१९ | ८६४४७ |
| २०११-१२ | ८७६४८ | १३३०४ | १००९५२ |
| २०१२-१३ | १०३४४८ | १५१९२ | ११८६४० |
| २०१३-१४ | ११०३७४ | १६५८७ | १२६९६१ |
| २०१४-१५ | ११८६४० | २०२१३ | १३८८५३ |

आधार : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१४-१५, अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

महाराष्ट्र राज्याचा २०१०-११ ते २०१४-१५ या पाच वर्षातील एकूण कर महसूल वरील तक्तामध्ये दाखविण्यात आला आहे. सन २०१०-११ मध्ये राज्याला स्वत:चा कर महसूल ७५,०२८ कोटी रुपये होता. सन २०१४-१५ या वर्षी तो १,१८,६४० कोटी रुपयापर्यंत जाऊन पोहोचला. याचा अर्थ मागील पाच वर्षात राज्याच्या कर महसूलात एकूण १.५ पटीने वाढ झाली. त्याचप्रमाणे महाराष्ट्राला २०१०-११ मध्ये केंद्रीय करातील एकूण हिस्सा ११,४१९ कोटी रुपये मिळाला होता.

२०१४-१५ मध्ये तो हिस्सा २०,२१३ कोटी रुपये होता. गेल्या पाच वर्षात केंद्रीय करातील हिस्सामध्ये एकूण १.७ पटीने वाढ झाली. राज्य सरकारचा एकूण कर महसूल २०१०-११ मध्ये ८६,४४७ कोटी रुपये होता. २०१४-१५ मध्ये एकूण कर महसूलात १,३८,८५३ एवढी वाढ झाली. गेल्या पाच वर्षात राज्याच्या एकूण कर महसूलात १.६ पट वाढ झाली. वरील आकडेवारीच्या आधारे असे दिसून येते की, राज्य सरकारच्या कर महसूलात वाढ होत असली तरी गेल्या पाच वर्षात केंद्रीय करातील हिस्सात बऱ्यापैकी वाढ झाली आहे.

**महाराष्ट्राचा करेतर महसूल :**

महाराष्ट्र राज्याला कर महसूला व्यतिरिक्त करेतर महसूलाच्या मार्गाने देखील मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्ती होते. राज्याच्या करेतर महसूलात प्रामुख्याने व्याजाच्या जमा रक्कमा, केंद्रीय अनुदाने आणि इतर करेतर महसूल या बाबींचा समावेश होतो. .

**तक्ता क्र. ३ एकूण करेतर महसूल**

**(रुपये कोटी)**

| वर्ष | व्याजाच्या जमा रक्कमा | इतर करेतर महसूल | केंद्रीय अनुदाने | एकूण करेतर महसूल |
|---|---|---|---|---|
| २०१०-११ | १४२२ | ६८०३ | ११११६ | १९४२१ |
| २०११-१२ | १३५९ | ६८०९ | १२१६६ | २०३३४ |
| २०१२-१३ | २४६५ | ७५२० | १४३२२ | २४३०७ |
| २०१३-१४ | ३१४३ | ९६१५ | १८६९१ | ३१४४९ |
| २०१४-१५ | २९७४ | १०५३५ | २७९५८ | ४१४६७ |

आधार : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, २०१४-१५, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

तक्ता क्र. ३ मध्ये महाराष्ट्र राज्याचा २०१०-११ ते २०१४-१५ या पाच वर्षाचा एकूण करेतर महसूल दाखविलेला आहे. २०१०-११ मध्ये व्याजाच्या जमा रक्कमा एकूण १४२२ कोटी रुपयांच्या होत्या. या रक्कमामध्ये २९७४ कोटी रुपये इतकी वाढ झाली. मागील वर्षात राज्य सरकारच्या व्याजाच्या जमा रक्मेत एकूण जवळपास दोन पेटीने वाढ झाली. २०१०-११ मध्ये राज्याच्या इतर करेतर महसूल ६८०३ कोटी रुपये होता, तो २०१४-१५ मध्ये १०५३५ कोटी रुपये पर्यंत वाढला. इतर करेतर महसूलात मागील पाच वर्षात १.५ पटीने वाढ झाली. २०१०-११ या वर्षी महाराष्ट्राला १११९६ कोटी रुपयाचे केंद्रीय अनुदान प्राप्त झाले होते. २०१४-१५ मध्ये केंद्रीय अनुदान २७९५८ कोटी रुपये होते. पाच वर्षात केंद्रीय अनुदानात २.४ पट वाढ झाली. २०१०-११ मध्ये महाराष्ट्राचा एकूण करेतर

RNI. MAHMUL02937/2010/35848 IMPACT FACTOR - 4.35

SOCIAL GROWTH

ISSN 2229-6190

Issue : XIV, Vol. I, May 2017 To Oct. 2017 

महसूल १९४२१ कोटी रुपयाचा होता, २०१४-१५ मध्ये एकूण करेतर महसूल ४१४६७ कोटी रुपयांपर्यंत जाऊन पोहचला. म्हणजेच राज्याच्या एकूण करेतर महसूलात मागील पाच वर्षात जवळपास दोन पटीने वाढ झाली.

एकंदरीत या विश्लेषणाच्या आधारे असा निष्कर्ष काढता येतो की, महाराष्ट्राच्या महसूल प्राप्तीच्या प्रवृत्तीमध्ये सतत वाढ होत आहे. महाराष्ट्राचे महसूल खर्चाचे प्रमाण ही वेगाने वाढत आहे. त्यामुळे एकूणच महसूल प्राप्तीमध्ये अधिक वेगाने वाढ झाली तर राज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासाला गती देण्यासाठी राज्य सरकारकडे भक्कम अशी वित्तीय स्थिती निर्माण होवू शकेल.

## संदर्भ सूची :-

१) इंडियन इकॉनॉमी - गौरव दत्त व ए.महाजन

२) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१४-१५, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

PLEASE VISIT OUR WEBSITE

Www.irasg.com

S.P.Mahavidyalaya, Bhoom
BHOOM
Tq.Bhoom Dist.O'bad

PRINCIPAL
S.P.Mahavidyalaya, Bhoom
Dist.Osmanabad